ऋतू बदल.

शिशिर संपून आता वसंत ऋतूकडे वाटचाल सुरु झाली. पहाटे थंडी आणि दिवसभर उन्हाचा वाढता प्रभाव. नेहमीप्रमाणे मी तळजाईला निघालो. टेकडीच्या चढावरच्या रस्त्यावरुन जात होतो. डाव्या बाजूला केशरी रंगाचा सूर्य आकाशात वरवर चढत होता, पण आकाश ढगाळ होते आणि बऱ्याच प्रमाणात सूर्यबिंब झाकले गेले होते. आत प्रवेश करुन चालू लागलो. हिवाळ्यात पतझड सुरु झाली होती ती संपून झाडे आता निष्पर्ण झाली होती. काळ्या-करड्या रंगाची खोडे आणि तशाच निष्पर्ण फांद्या. एखादी दानशूर व्यक्ती आपले सर्व दान करुन निर्धन, निष्कांचन व्हावी, असाच तो सर्व भाग दिसत होता. खूप सगळे गवत पिवळे पडून पायवाटेवर त्यांचा एक थर तयार झाला होता. त्यावरुन चालत जाताना मऊ, गुबगुबीत गालिचावरुन चालत असल्यासारखे वाटत होते. पुढे चालत राहिलो. नवीन वनीकरण्यासाठी प्रचंड वृक्षतोड झाली होती. त्यामुळे डोंगराचा सगळा भाग उजाड दिसत होता. आणखी थोडे पुढे जाता थोडी फार हिरवी पालवी राखलेले उंच उंच वृक्ष दृष्टीस पडले. साहजिकच त्यावर पक्षी किलबिलत होते. बुलबुल, दयाळ, पारवे दिसत होते. ह्याच दिवसात दिसणारा लाल, भगव्या छातीचा काळसर पाठीचा मुठीएवढा 'निखारा' किंवा small minivet ही विरळ पालवी मुळे दिसत होते. उंच शेंड्यांवर बसून 'तांबट' पुक पुक आवाज करीत 'हा माझ्या आधिपत्त्याखालचा प्रदेश आहे असा संदेश देत होते. मी इथे आहे अशी मादीला साद घालत होते. असंख्य लोकांच्या चालण्यामुळे वाटेवरची पांढरी-राखाडी धूळ उडत होती. पण रस्त्याच्या कडेला नाभळीच्या झाडांची पाने खाली पडून 'गुलाबी'

रंगाची झाली होती त्यामुळे तो भाग 'गुलाबी' गुलाबी दिसत होता. पूर्वी अनेक पळसाची झाडे होती आणि त्यांची लालभडक फुले ह्या दिवसात दिसून येत. पण ह्या वेळी ही झाडे दिसलीच नाहीत. जंगलामधे ज्या प्रमाणात पक्ष्यांचा वावर, हालचाल असते तीही फारशी नव्हती.

पुन्हा हिरवेगार जंगल दिसण्यासाठी आता आधी वसंत ऋतूची आणि 'वर्षा' ऋतूची वाट पहायला हवी.

रवींद्र जोशी.
१५ फेब्रु. २०२४.





चित्र : श्री. प्रकाश देशपांडे